सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

आयुकाजवळ, गणेशखिंड, पुणे – ४११००७

दूरध्वनी क्र. ०२०-२५६०११४३, २५६०११४२, टेलिफॅक्स ०२०-२५६९७५११

संदर्भ: विक्रीमं/३/१०६९ दिनांक : १२ जानेवारी, २०१९

प्रति,
मा. विभागप्रमुख,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर विभाग

विषय : "खेलो इंडिया युथ गेम्स – २०१९"...

महोदय / महोदया,

आगामी ऑलिम्पिक व आशियाई स्पर्धेच्या तयारीच्या दृष्टीने गुणवंत व उदयोनमुख खेळाडू निवडून त्यांना तंत्रशुद्ध प्रशिक्षण व अर्थसहाय्य देणे, खेळासाठी पूरक वातावरण निर्माण करून सांघिक भावना निर्माण करणे, नेतुत्व गुणांचा विकास करणे तसेच खेळ हे सर्वांगिण विकासासाठी महत्त्वपुर्ण बाब असून आगामी काळात देश खेळामध्ये महाशक्ती निर्माण व्हावी हा प्रमुख उद्देश ठेवून केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने खेलो इंडिया युथ गेम्स, २०१९ या शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी, पुणे येथे दि. ०९ ते २० जानेवारी, २०१९ या कालावधीत आयोजित करण्यात आल्या आहेत.

खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत १८ खेळांच्या स्पर्धा होणार असून स्पर्धेमध्ये देशभरातील १७ वर्षाखालील व २१ वर्षाखालील मुले व मुली या गटात सुमारे १०,००० खेळाडू सहभागी होणार आहेत. तसेच सदर ठिकाणी Sports Expo चे आयोजन सुद्धा करण्यात आले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात सदर स्पर्धा या बालेवाडी, पुणे येथे होत असल्याने त्या पाहण्याची सुवर्णसंधी असणार आहे.

तरी उपरोक्त कालावधीत आपल्या विभागातील खेळाडू, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना सदर स्पर्धा दाखवण्याचे नियोजन विभागीय स्तरावर करावे व ही सुवर्णसंधी त्यांना उपलब्ध करावी, ही विनंती. तसेच सदरच्या स्पर्धांचे थेट प्रक्षेपण स्टार स्पोर्टस (Star Sports) या वाहिनीवर सुद्धा दाखविण्यात येणार आहे.

शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी, पुणे येथे भेटीच्या सहकार्यासाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

- डॉ. अभिजित कदम :- ९६८९८२७०३८
- डॉ. दादासाहेब ढेंगळे :- ७५०७७०१७२७
- डॉ. अय्याज शेख :- ९४२२५१७८०९
- प्रा. शिरीष मोरे :- ९५४५४५५९१०
- प्रा. अनिरुद्ध शर्मा :- ७७०९९९९९९७

कळावे,

आपला,

प्रा. (डॉ.) दिपक माने,
संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ,
अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा